

# संपादकीय

## गोरगरिबांचे जीव कवडीमोल

मागील आठवड्यात मुंबईतील नागपाडा येथे मोठी दुर्घटना घडली. पाण्याची टाकी साफ करण्यासाठी आत उतरलेल्या पाच मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला. एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत ही धक्कादायक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत पाच मजुरांचा मृत्यू झाला तरीही त्याची दखल माध्यमांनी घेतली नाही. नाही म्हणायला प्रिंट मीडिया म्हणजे वर्तमान पत्रात या दुर्घटनेची बातमी छापून आली पण इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे न्युज चॅनलने या बातमीची दखलच घेतली नाही. एरव्ही कोणत्याही अदखलपात्र बातम्या ब्रेकिंग न्युज म्हणून दाखवणाऱ्या न्युज चॅनल वाल्यांना या बातमीची दखलही घेऊशी वाटली नाही हे विशेष. अर्थात पाण्याच्या टाकीत पडून गोरगरीब मजुरांचा मृत्यू झाल्याची ही पहिली दुर्घटना नाही या आधी अशा अनेक घटना घडल्या मात्र त्याची दखल घ्यावी असे कोणाला वाटले नाही. दोन वर्षापूर्वी पुणे जिल्ह्यातील कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीच्या हद्दीत लोणी स्टेशन येथे एका इमारतीच्या शौचालयाची टाकी साफ करताना चार मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला होता. अर्थात या दोन घटना वर्तमानपत्रात छापून आल्यामुळे त्या लोकांना समजल्या अशा अनेक घटना नेहमी घडत असतात. अनेकदा शौचालय साफ करताना, मोठमोठे सांडपाणी वाहक बंदिस्त नाले साफ करण्याकरिता उतरलेले सफाई कामगार आतील विषारी वायूच्या संपर्कात येऊन मरण पावल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने यात अनेकांचा बळीही गेला आहे. नवी मुंबईत अशीच एक दुर्दैवी घटना घडली होती नवी मुंबईतील एरोली येथील शिवशंकर प्लाझा या इमारती बाहेर लेनस्कर्ट या चष्म्याच्या दुकानाबाहेर लावण्यात आलेला जाहिरातीचा फलक बदलण्यासाठी लावण्यात आलेली २५ फूट उंचीची चाकवाली शिडी सरकून वरच्या उच्च दाबाच्या वाहिनीला लागल्याने तिच्यात विद्युतप्रवाह उतरला या शिडीला एका ११ वर्षाच्या गरीब मुलाचा स्पर्श झाला त्यात त्या मुलाचे जळून निधन झाले. आताची नागपाडा येथील दुर्घटना तर त्याहून मोठी आहे त्यात पाच मजुरांचा जीव गेला तरीही त्याची दखल ना माध्यमांनी घेतली ना राजकीय नेत्यांनी ना समाजाने.

आपल्या देशात गोरगरीब मजुरांचा जीव कवडीमोल आहे. हे गोरगरीब जगले काय नी मेले काय याचे कोणालाही काहीही सोयरसुतक नाही. अशा दुर्दैवी घटनेत अनेक मजुरांनी आपला जीव गमवला आहे. अनेक मजूर योग्य त्या सुरक्षेअभावी उंच बांधकामावरून पडून जीवाला मुकतात किंवा कायमचे अपंग होतात. काही मजूर पाण्याच्या, शौचालयाच्या टाकीत पडून मरतात. काही मजूर नाले सफाई करताना श्वास गुदमरून मरतात तर काही मजूर विजेच्या खांबावर चढून विजेचे काम करताना शॉक लागून मरतात. अशा प्रकारे अनैसर्गिक मृत्यू पावणाऱ्यांची संख्या शेकडोंच्या घरात असते पण त्याची दखल शासन, माध्यमे, समाज, पोलीस न्यायालय कोणीच घेत नाही कारण ते गरीब आहेत. सर्वसामान्य नागरिक आहेत तेच जर सुशांतसिंग राजपूत, पूजा चव्हाण यांच्यासारखे सेलिब्रिटी असते तर सर्व यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असत्या. माध्यमांनी २४ तास ब्रेकिंग न्युज चालवून टाहो फोडला असता. विरोधी पक्ष किंवा राजकीय नेतेमंडळींनी निदर्शने रास्ता रोको , धरणे आंदोलने केली असती.

पण सर्व सामान्य गोरगरिबांच्या मृत्यूचे येथे कोणालाच काही देणेघेणे नाही, गरीबच होता त्याच्या मृत्यूची दखल घ्यायला तो काय सेलिब्रिटी होता का ? असाच विचार येथील यंत्रणा करत असतील म्हणूनच गोरगरिबांच्या निधनानंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणी पुढे येत नाही. गरीब म्हणून जन्माला येणे हा या देशात शाप आहे. सेलिब्रिटींना न्याय मिळवून देण्यासाठी येथील यंत्रणा जितक्या जागृत असतात तितक्याच त्या गोरगरिबांना न्याय मिळवून देताना उदासीन असतात. गोरगरिबांच्या जीवाला येथे मोल नाही. कवडीमोल असलेले जगले काय नी मेले काय कोणालाच काही फरक पडत नाही हेच वास्तव आहे.

माणूस सामान्य असो गरीब असो की श्रीमंत असो प्रत्येकाचा जीव महत्वाचा असतो तथापि दुर्दैवी घटनांमध्ये गरिबांचे जीव हे बेदखल केले जातात, ही संतापाची बाब आहे. कोणत्याही निधनाच्या घटनेकडे सरकार बरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलपणे पाहण्याची गरज आहे. आज बदलत्या समाज व्यवस्थेमध्ये संवेदनशीलता हरवत चालली आहे हे देखील सत्य आहे. समाजाने अधिक संवेदनशील राहिले पाहिजे.

# पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १७ मार्च, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांची जयंती. २१ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता.

त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले.

अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत



भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले.

तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्लूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली.

परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली.

त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे.

**पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अहिल्यानगरमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करा : खासदार नीलेश लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील नागरीकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी मतदारसंघात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी संसदेत केली. या प्रश्नाकडे संसदेचे लक्ष वेधताना खा. लंके यांनी सांगितले की, अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघ हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा मतदारसंघ असून जिल्हयाची लोकसंख्या ५० लाखांहून अधिक आहे.असे असतानाही जिल्ह्यात एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच रूग्णांना इतर शहरांकडे धाव घ्यावी लागते. या परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने त्वरीत पावले



उचलावीत अशी मागणी खा. लंके यांनी संसदेत केली.

दरम्यान, या मागणीचे पत्र खा. नीलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय स्वास्थ्य व परिवार कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सितारमण, तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना दिले आहे. पंतप्रधानांसह इतर मंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्ह्याची स्थिती मागासलेली आहे. गरीबांसाठी स्वस्त आणि सुलभ आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी या जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे अत्यंत गरजेचे आहे. नगर दक्षिण मतदारसंघात ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये अद्यापही पुरेशा आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत. त्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय रूग्णांना पुणे, औरंगाबाद किंवा मुंबई येथे जावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत असल्याचे लंके यांनी निदर्शनास आणून दिले. जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी एमबीबीएस आणि उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी बाहेरच्या राज्यात जाण्यासाठी मजबूर होता. कोविड १९ महामारीच्या काळात जिल्ह्यात आरोग्य सुविधांचा मोठा अभाव जाणवला. भविष्यात संभाव्य आरोग्य आपत्ती टाळण्यासाठी जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे गरजेचे असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले.

## मिलीभगत..

घरचा आहेर देणे
नवा प्रकार पध्दत
राहे वाकडे बोलत
होई स्वभावउध्दत

अयोग्य वेळी कसे
मांडतो आपलेमत
निदान परक्यातरी
नका दाखवू दुमत

मिठ खडा आनंदा
हळूं टाके अलगत
विस्कोट करायची
कला असे अवगत

कधीहोत न हिंमत
बरळत राहे स्वगत
खोटे मिथ्या हसत
करत बसे स्वागत

स्पष्टपणे कधीचं हे
नाहीत काहीमागत
नमागता ह्दय देता
तरी ना जाई आदत

साचेबद्ध छानशब्द
असतात मुखोत्गत
काढूनि टाका कीड
नकोत असलेभगत

समज देता कितीदा
त्यांचेमुळी न भागत
बाहेरच्या शत्रूसोबत
अंतस्था मिलीभगत

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# ‘मीपण’ सोडूया !

‘मी’ या प्रथम-पुरुषी एकवचनी सर्वनामामध्ये आपलं स्वतःचं अस्तित्व दडलं आहे. अध्यात्मामध्ये ‘मी’ ही वृत्ती द्वैताला कारण आहे, असं म्हटलं आहे. आवड- निवड, आग्रह, हट्ट, अभिमान, ही मीपणाची लक्षणे आहेत.

लहान मुल घरातल्या सर्वांचं लक्ष स्वतःकडे आकर्षित करण्यासाठी धडपडत असतं. वेड वाकडं काहीतरी ते बोलत, तर कधी कधी विचित्र शारीरिक हालचाली करून दाखवतं. या सर्व गोष्टी मागे त्याची मीपणाची नैसर्गिक भावना असते. तेच मूल जसं जसं मोठ होत जात,त्याच्यातील समज वाढत जाते तसं तसं त्याला असं लोकांना प्रभावित करू वाटत नाही. लोकांनी आपल्याला चांगलं म्हणावं, आपला आदर तित्य करावा, कमीत कमी आपली विचारपूस करावी ह्या भावना मोठेपणी प्रत्येकात अस्तित्वात राहतातच.

खरंतर जगात फक्त ’ मीच ’ माझा असतो. दुसऱ्या, तिसऱ्या कोणालाही माझ्या अस्तित्वाची कल्पना नसते. माझे अस्तित्व हे माझ्यासाठी खूप महान,चेतनादायी, विश्वव्यापी कल्पना असते.कधी कधी माझ्याशिवाय या जगाचे पानही हलणार नाही, इतका अहंभाव मी मानत असतो.

माझा अहंभाव, माझा सन्मान, माझे अस्तित्व या एका अर्थाने स्वतःच्या स्वाभिमानासाठी आवश्यक गोष्टी वाटतात ; पण हे जेव्हा एका मर्यादेच्या पलीकडे वाढत जातं,तेव्हा सारं काही माझ्यापुढे शिल्लक वाटू लागते, आणि तेथून सुरू होतो मी पणा...प्रत्येक ठिकाणी मला सन्मानच मिळाला पाहिजे, ही भावना बाळगणे गैर नाही. ती व्यक्ती प्रतिष्ठेला धरून रास्तच आहे. परंतु ही मागणी व्यवहारात शक्य होत नाही. एखाद्या दिवशी एखाद्याला लोक




डोक्यावर घेऊन मिरवतात,तर दुसऱ्या दिवशी त्याला पुन्हा अलगद जमिनीवर सोडतात. कधी कधी अपमानित करतात. कधी कधी दुर्लक्षित करतात. प्रत्येक दिवशी सन्मान मिळालाच पाहिजे, हा हट्ट धरणे कितपत योग्य आहे...? लहान मुलासारखं मला बघा मला...मला बघा... म्हणत स्वतःकडे सर्वांचे लक्ष वळवण्यात काय मजा आहे...? माणसाची लढाई भौतिक गोष्टींच्या पूर्ततेनंतर सन्मानासाठी असते, हे जरी खरं असलं तरी वरवरच्या मिळणाऱ्या सन्मानासाठी कितपत झुरायचं...? हे ज्याचं त्याचं त्यांनी त्यांनी ठरवलं पाहिजे. मीपणा जेवढा सोडत जाऊ,तेवढा ’ विरक्तपणा ’ आपल्यामध्ये येत जाईल. मीपणा सोडल्यास स्वतः आणि समाजाला वस्तुनिष्ठपणे, न्याय आणि गंभीरपणे पाहता आणि समजून घेता येईल. मीपणा सोडल्यास एक पारदर्शक दृष्टी आपल्याला मिळेल. ज्याप्रमाणे घरातील भिंतीवर कोळी आपल्या भोवती जाळे विणतो ; त्याप्रमाणे मीपणा हा आपल्या भोवती विणलेल्या जाळ्याप्रमाणे बांधून, अडकवून ठेवत असतो. मी पण आपल्यातून निघून गेला, तर आपण स्वतंत्र, सर्वव्यापी, समाजशील बनून जातो. मीपणा आपली प्रगती खुंटवतो. अल्बर्ट आईन्स्टाईन याच्या मते – ’ अधिक ज्ञान मीपणा कमी करतो, तर अधिक मीपणा आपले ज्ञान कमी करतो. ’ रावण, दुर्योधन आणि कंस यांचा मध्ये मीपणा ओसंडून वाहत होता. त्यांच्यामध्ये क्षमता होती, पण मीपणामुळे त्यांचा घात झाला.

पु ल देशपांडे यांनी आपल्या कवितेतून मीपणा किती वाईट आहे हे पुढील शब्दात सांगितलं आहे –

**एकदा मी पणा विकून पहा...**
जेव्हा कोणीही घेणार नाही तेव्हा समजेल
की किती फालतू गोष्ट
आपण इतके दिवस बाळगत होतो...?

’ ज्याच्याजवळ काही नसतं तो मोठ्या प्रमाणात मीपणा करतो, तर ज्याच्याजवळ खूप असतं तो कधीच मी पणा करत नाही. ’ हे तर त्रिवार सत्य आहे. सद्गुरु वामन पै यांच्या मते ’ मी पण म्हणजेच स्फुरण आहे.’ समुद्राच्या लाटांप्रमाणे ते नेहमी उसळी मारत असतं. माझे नाव, पद,श्रीमंती, जन्मजात मिळालेल्या ओळखी..... अशा अनेक गोष्टींची आलेली ती लाट असते. त्याला स्वतंत्र अस्तित्व नसतं. लाट जशी समुद्रात विरून जाते, त्याप्रमाणे या गोष्टी देखील काळानुरूप विरून जाणार आहेत. याचे भान आपण सतत ठेवलं पाहिजे. कारण मी पणातूनच श्रेष्ठ कनिष्ठत्त्वाची भावना वाढीस लागत असते. दुजाभाव आणि द्वेष निर्माण होत असतो.

चला स्वतःला मीपणामनापासून अलिप्त करूया. ताठरता सोडून लवचिक बनूया. खुर्ची नसेल तर जमिनीवर बसायची तयारी ठेवूया. सत्कार नाही, तर सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न करूया. मग बघा जीवन किती साधं, सोपं आणि सुटसुटीत बनेल...

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## माऊली प्रतिष्ठान तर्फे एक' पुरणपोळी 'मायेची...




**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** होळी, धुळवड सणाचे निमित्त साधून शहापूर मधील सामाजिक कार्यात अग्रणी असणाऱ्या माऊली प्रतिष्ठान च्या वतीने समाजात असेही काही आपले बांधव आहेत ज्यांना बिकट परिस्थितीमुळे त्यांच्या नशिबी होळीची पुरणपोळी खाण्याचे भाग्य देखील नाही. याच जाणिवेतून होळी सणाच्या पार्श्वभूमीवर आपण समाजाचे देणे लागतो या उदात्त भावनेतून नगरसेविका रजनी संतोष शिंदे आणि माऊली प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष संतोष शिंदे यांनी होळीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवते समयी एक किंवा दोन अधिकच्या पुरणपोळ्या आणाव्यात होते. माऊली प्रतिष्ठान चे स्वयंसेवक प्रत्येक होळीच्या ठिकाणी उपस्थित असतील त्यांच्याकडे या पुरणपोळ्या सुपुर्द कराव्यात आणि ते नंतर या गोरगरीब बांधवांपर्यंत पोहोचवतील असे नागरिकांना आवाहन केले होते. शिंदे दाम्पत्याच्या या आवाहनाला नागरिकांनी उत्स्फूर्त असा भरघोस प्रतिसाद दिला आणि असंख्य पुरणपोळ्या प्राप्त झाल्या. या पुरणपोळ्या वस्ती- पाड्यांवर गोरगरीब बांधवांना स्नेहभावाने वाटप करण्यात आल्या. यावेळी या गोरगरीब बांधवांच्या तसेच त्यांच्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यांवर आगळे समाधान झळकले होते. या समाजोपयोगी उपक्रमासाठी पुरणपोळ्या देऊन बहुमोल सहकार्य केलेल्या सर्व सन्मानीय नागरिकांचे मन: पूर्वक आभार. तसेच माऊली प्रतिष्ठान शहापूर च्या स्वयंसेवक पदाधिकारी गौतम गोडे माजी सरपंच, पत्रकार बंधू श्री भालेराव, सुमेध जाधव, मधुकर चन्ने, कुणाल जाधव, निखिल जाधव या कार्यकर्त्यांनी पुरणपोळ्या वाटपाचे बहुमोल कार्य केल्याबद्दल नागरिकांचे आभार मानले.

## घरकुल बांधकामास रेती उपलब्ध करून द्या...
## पिंप्रड ग्रामपंचायतची मागणी...

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१६, झरी (यवतमाळ) :** झरी तालुक्यातील पिंप्रड ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करीता रेती उपलब्ध व्हावे म्हणून ग्रामपंचायत मीटींगमध्ये ठराव घेण्यात आला. पिंप्रड ग्रामपंचायत सरपंच महेंद्र आवते. उपसरपंच मधूकर ठाकरे व उपस्थित सदस्य यांनी पं. स. झरी गटविकास अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे रेतीची मागणी केली आहे.


गट ग्रामपंचायत पिंप्रड (बै)
पं.स.झरीजामणी जि.यवतमाळ
श्री.महेंद्र झिंगाजी आवते, सरपंच, ८२७५९८४७०४३
श्री.मधुकर गेडबाजी ठाकरे, उपसरपंच, ९६८९३१२८८३
श्री.निखील एम. वेलगुरवार, सचिव, ९५९५९५०३६४

सदस्य / सदस्या (left column, partly illegible)

जा.क्र.........
दि.११/३/२०२५

प्रती
मा. तहसीलदार साहेब
झरी जामणी जी यवतमाळ

विषय:- मौजा पिंप्रड अंतर्गत बैलमपूर शिवारा मधुन नदीची रेती मिळण्याबाबत .
अर्जदार:- गट ग्रा प पिंप्रड ( बैलमपूर ) येथील समस्त ग्रामस्थ

महोदय,
आम्ही गट ग्रा प पिंप्रड ( बैलमपूर) येथील समस्त ग्रामस्थ सविनय पूर्वक अर्ज सादर करतो की, आमच्या गावाला पिंप्रड व बैलमपूर येथे एकूण १४० घरे मंजूर असून रेती अभावी घरकुलाचे काम पुर्ण होत नसल्यामुळे ग्रा प मध्ये दि २६/०१/२०२५ ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांच्या मांगणी नुसार ठराव घेण्यात आला की जवळच्या नदीमधूनरेती उपलब्ध करून देण्यात यावी.
करीता सविनय सादर.

प्रतिलिपी
1. गटविकास अधिकारी ,झरी
2. जिल्हाधिकारी, यवतमाळ
3. आमदार, वणी विधानसभा

11/3/2025
पंचायत समिती, झरी जामणी

तालुक्यात रेतीअभावी घरकुल बांधकामाचा प्रश्न निर्माण झाला आहे, केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी घरकुल योजनेद्वारे घरे मंजूर झाले मात्र रेती उपलब्ध होत नसल्याने बांधकामे थांबली आहेत. घरकूलांना गती देण्यासाठी रेती उपलब्ध करून द्या अशी मागणी वाढली आहे.

तालुक्यातील अनेक गावांत रेती अभावी घरकुल बांधकामे ठप्प पडली आहे. यंदा मार्च महिना अर्धा अधिक संपला तरी पैनगंगा नदीवरील रेती घाट लिलाव न झाल्याने तालुक्यातील अनेक ठिकाणी ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने पं स. झरी गटविकास अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी केली त्यानुसार २६ जानेवारी रोजी पिंप्रड ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने सूद्धा मिटींमध्ये ठराव घेण्यात आला आहे. आणि ११ मार्च २०२५ रोजी पंचायत समिती झरी येथील गटविकास अधिकारी यांच्या कडे घरकुल बांधकामास जवळपासच्या पैनगंगा नदी घाटांवरून रेती मिळावे म्हणून निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## पळसपूर येथे शिवजयंती उत्सव...
## पळसपूर ग्रामस्थांतर्फे भव्य शिवजयंती उत्सवाचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपूर येथे यावर्षी ग्रामस्थांच्या वतीने तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव सोमवार दि. १७ मार्चला साजरा होणार असून तयारीची लगबग सुरू झाली आहे. या निमित्ताने ढोल ताशांच्या गजरात आणि शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण पळसपूर परिसर भगवेमय होणार असून शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक शिवप्रेमी ग्रामस्थ पळसपूर यांनी दिली. आज रविवार दि.१६ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता शिवनेरी ते पळसपूर शिव ज्योत आणण्यासाठी गड किल्ला शिवनेरी कडे प्रस्थान होणार आहे. सोमवार दि.१७ मार्च रोजी सकाळी ८ वाजता शिवज्योतिचे भव्य आगमन मिरवणूक काढण्यात येते. सायंकाळी सहा वाजता शिवजयंती कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन व शिवरायांची आरती झाल्यानंतर सायंकाळी सात वाजता पळसपूर ग्रामस्थांच्या वतीने शिवभोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी रात्री १० वाजता धर्मवीर संभाजी राजे महाराज यांच्यावर आधारित छावा चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण या कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांना दाखविण्यात येणार आहे. तरी पळसपूर परिसरातील तमाम शिवभक्तांनी सहकुटुंब सहपरिवार या शिवजयंती उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ पळसपूर व शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## ७ एप्रिल रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे एप्रिल महिन्याचा लोकशाही दिन दि.०७ एप्रिल २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि.२४ मार्च २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

सदर अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

## मुंबईत पालिका कर्मचाऱ्यांना मिळणार १२ लाखात स्वत:च्या हक्काचे घर...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१६, मुंबई :** मुंबईत स्वत:च्या मालकीचे घर असावे असे प्रत्येकाला वाटते. पण घराची किंमत आवाक्याबाहेर असल्यामुळे अनेकांचे स्वप्न अपूर्णच राहते, पण बीएमसी म्हणजे मुंबई महापाचिका मात्र आपल्या कर्मचाऱ्यांचे हे घर खरेदी करण्याचं स्वप्न लवकरच पूर्ण करणार आहे.

मुंबई महापालिकेच्या तृतीय आणि चतुर्थ श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही अत्यंत आनंदाची बातमी आहे.नुकताच मुंबई महापालिका प्रशासनाने म्हाडाच्या धर्तीवर घरे विकण्याचा निर्णय घेतला आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांना आता १२ लाखांत स्वत: चे घर खरेदी करता येणार आहे.




मुंबई महापालिकेच्या तृतीय आणि चतुर्थ श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मुंबईच्या माहुल परिसरात ४,७०० घरे बांधण्यात आली आहेत. या घरांची किंमत १२ लाख ६० हजार रूपये इतके असून, ही घरे लॉटरीच्या माध्यमातून विकली जाणार आहेत. या घरांसाठी महापालिका कर्मचाऱ्यांना सोमवारपासून अर्ज करता येणार आहे.

माहुलमधील तब्बल १३ हजारांपेक्षा जास्त घरांना गेल्या काही दिवसांत खरेदीदार मिळाले नाहीत. त्यामुळे बीएमसी म्हाडाच्या मार्फत या घराची लॉटरी काढणार आहे.अनेक दिवसांपासूना रिक्त असणाऱ्या या सदनिकांच्या देखभालीचा खर्च पालिकेला करावा लागतोय. त्यामुळे या सदनिका आता महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर विकण्याचा निर्णय घेतला आहे. एमएमआरडीएनं प्रकल्पबाधितांसाठी इमारती बांधून त्यातील सदनिकांचे हस्तांतरण महापालिकेला केले. विविध विकास प्रकल्पांमध्ये घर बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना माहुल येथील सदनिकांमध्ये राहण्यासाठी घरे उपलब्ध करून दिली जात आहेत.

दरम्यान या इमारतीच्या संकुलात शाळेसह रूग्णालय आणि इतर सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. जर कर्मचाऱ्यांना हे घर विकायचे असल्यास ५ वर्षांनंतर कधीही विकू शकतात. यासाठी सोमवारपासून अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

## शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण संपन्न...

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१६, मुंबई :** प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आणि बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या वीस दिवसांपासून सुरू झालेले मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना जी/दक्षिण विभागातील केशवराव खाड्ये मार्ग शाळेत प्रशिक्षण देण्यात आले. २.० हे प्रशिक्षण अतिशय सुरळीत आणि शिस्तबद्ध पध्दतीने देण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक आराखडा पायाभूत व शालेय स्तर क्षमता आधारीत अध्ययन व अध्ययन प्रक्रिया,क्षमता आधारीत मूल्यांकन संकल्पना,समग्र प्रगतीपत्रक,विचारप्रवर्तक प्रश्न,शाळा गुणवत्ता मूल्यांकन, आणि आश्वासन आराखडा अशा जवळपास पंधरा घटकांचा समावेश असलेल्या या प्रशिक्षणासाठी शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षक अगदी वेळेवर येऊन जबाबदारीने प्रशिक्षण घेत असल्याचे आढळून आले.

आतापर्यंत शिक्षकांच्या तीन बॅच पूर्ण झाल्या असून साडेपाचशे शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले आहे. शेवटच्या आणि चौथ्या बॅचमध्ये एकूण २३२ शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणासाठी जी/दक्षिण विभाग आणि जी/ उत्तर या दोन्ही विभागातील सर्व माध्यमाच्या शिक्षकांची तसेच सर्व स्पेशल शिक्षकांची लक्षणीय उपस्थिती होती.प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांना युआरसी तर्फे प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. युआरसी -११ चे समन्वयक सुदाम फरडे यांच्या उत्तम नियोजनाखाली व मुंबई शहर विभागाच्या अधिक्षक छाया साळवे, जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे जी/उत्तर विभागाच्या प्रशासकीय अधिकारी स्नेहलता डुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण संपन्न झाले.

प्रशि.अरविंद पवार, लिना देसाई, महेश लोणारे, प्रशांत पाटील, दिलीप खांडरे, अच्युत सर, सना सोहेल, जयश्री दडस, शीतल ढेरे यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणार्थी शिक्षकांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. तसेच सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांना आज मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रशिक्षण सुरळीत पार पाडण्यासाठी विभाग निरीक्षक बागेश्री केरकर, उज्वला कोंडा, सुरेश घिगे, केशवराव खाड्ये मार्ग शाळेच्या इमारत प्रमुख व मुख्याध्यापक प्रमिला सिंग आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## अंगणवाडी सेविका, मदतनीस भरती प्रक्रियेत आमिषाला बळी पडू नये...

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१६, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस भरती प्रक्रिया ८५ जागेसाठी एकूण ६९५ उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाले असून ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व गुणाणुकरमे ,गुण जास्त आहेत अशाच उमेदवाराची निवड होणार आहे त्यामुळे कोणत्याही उमेदवारांनी आर्थिक आमिषाला बळी पडू नये. असे आव्हान आमदार बाबुराव कदम कोळहळीकर यांनी केले आहे.

मागील काळामध्ये सदरील भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचे पुरावे माझ्याकडे आहेत असे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी शासकीय विश्रामगृह हदगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आहेत. ही निवड प्रक्रिया उमेदवाराचे शालेय गुणांनुक्रमेनुसार असून त्या शालेय गुणात त्यांची निवड होणार आहे.

त्यामुळे कोणाची शिफारस या अंगणवाडी भरती प्रक्रियेत चालणार नाही किंवा अशी काही माहिती ऐकू आली तर ती भरती प्रक्रिया रद्द करण्यात येईल. जर याच्यामध्ये एखादा कर्मचारी अधिकारी जर सामील झाला तर त्याचे निलंबन करण्यात येईल .असे सांगितले आहे. बारावी परीक्षेमध्ये जे गुण मिळवले आहेत तसेच बीए ,बीएड एम .ए . मागासवर्गीय ओबीसी एससी एसटी विधवा यांना जी शासन गुण देण्यात येत आहेत ते गुण एकत्रित करून गुणाची बेरीज ज्याची जास्त येईल अशा उमेदवारांना पात्र ठरविण्यात येईल. एखादा उमेदवार



जर पात्र असतांना सुद्धा त्याच्याकडून जर दलालामार्फत कोणी आर्थिक व्यवहार केला व ही बाब माझ्या लक्षात आल्यास त्याला पण सोडण्यात येणार नाही.कडक कारवाई करण्यात येईल. ही निवड प्रक्रिया पारदर्शक असून या निवडीत कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही जर असे आढळून आले असते त्याच्यावर कायदेशीर कारवाई करून ही निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल अशी माहिती आमदार बाबुराव कदम कोळेकर यांनी दिली. यावेळी वॉटर ग्रीड व इतर विषयावर सुद्धा चर्चा करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील बाभळीकर माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजी मामा लांडगे, जनसंपर्क अधिकारी तवर ,आरोग्य समिती सदस्य राजूभाऊ तावडे महिला जिल्हाप्रमुख शितलताई भांगे युवा जिल्हाध्यक्ष संदेश पाटील हडसणीकर व शहर प्रमुख बबन माळोदे यांच्यासह बरेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

## ७२व्या वरिष्ठ गट पुरुष/ महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१६, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असो. विश्वास सामाजिक संस्था, ठाणे यांच्या सहकार्याने ७२व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे आयोजन करीत आहे.

ठाणे(पश्चिम) येथील जे. के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर(कॅडबरी कंपनीच्या समोर) दिनांक १९ मार्च ते २३ मार्च या कालावधी ही स्पर्धा होईल. त्या स्पर्धेची गटवारी आज तांत्रिक समितीने जाहीर केली. या स्पर्धेत पुरुषांत सर्व संलग्न जिल्हा संघांचा सहभाग असून महिला गटात उस्मानाबाद(धाराशिव) व हिंगोली जिल्हा संघांचा सहभाग नाही. जाहीर करण्यात आलेली गटवारी खालील प्रमाणे.

**पुरुष गट विभागणी**

१) अ गट :- १)पुणे ग्रामीण, २)बीड, ३)नाशिक शहर.
२) ब गट :- १)अहमदनगर, २) ठाणे ग्रामीण, ३)नांदेड, ४)हिंगोली.
३) क गट :- १)नंदुरबार, २)ठाणे शहर, ३)रायगड, ४)लातूर.
४) ड गट :- १)पुणे शहर, २)रत्नागिरी, ३)परभणी, ४)सिंधुदुर्ग.
५) इ गट :- १)मुंबई उपनगर पूर्व, २)सांगली, ३)धुळे, ४)सोलापूर.
६) फ गट :- १)पिंपरी चिंचवड, २)मुंबई उपनगर पश्चिम, ३)नाशिक ग्रामीण, ४)सातारा.
७) ग गट :- १)कोल्हापूर, २)मुंबई शहर पश्चिम, ३)जालना, ४)उस्मानाबाद.
८) ह गट :- १)पालघर, २)मुंबई शहर पूर्व, ३) जळगांव, ४)औरंगाबाद.

**महिला गट विभागणी**

१) अ गट :- १)पुणे ग्रामीण, २)सिंधुदुर्ग, ३)नांदेड.
२) ब गट :- १)रत्नागिरी, २)कोल्हापूर, ३)अहमदनगर.
३) क गट :- १)मुंबई उपनगर पूर्व, २)सातारा, ३)ठाणे ग्रामीण.
४) ड गट :- १) पिंपरी चिंचवड, २)नाशिक शहर, ३)परभणी, ४)जालना.
५) इ गट :- १)पुणे शहर, २)नंदुरबार, ३)रायगड, ४)लातूर.
६) फ गट :- १)पालघर, २)मुंबई शहर पूर्व, ३)धुळे, ४)बीड.
७) ग गट :- १) ठाणे शहर, २)मुंबई शहर पश्चिम, ३)नाशिक ग्रामीण, ४) जळगांव.
८) ह गट :- १)सांगली, २) मुंबई उपनगर पश्चिम, ३)सोलापूर, ४)औरंगाबाद.

## येळकोट येळकोट जय मल्हार च्या गजरात झापुक झुपुक चे पोस्टर लाँच

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१६, बारामती :** बिग बॉस मराठी विजेता सुरज चव्हाण मुख्य कलाकार म्हणुन काम करत असणारा चित्रपट झापुक झुपुक च्या पोस्टर चे काल महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या क्षेत्र जेजुरी येथील खंडोबा देवाच्या साक्षीने लाँच करण्यात आले. झापुक झुपुक ची संपुर्ण टीम या वेळी उपस्थित होती.

सुरज चव्हाण हा दिसल्या नंतर अनेक चाहत्यांनी त्याच्या सोबत फोटो काढण्याचे प्रयत्न ही केले. जेजुरी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त अभिकाका देवकाते यांनी टीम ला सहकार्य केल्या बद्दल सुरज चव्हाण ने त्यांचे आभार मानले. देवस्थानच्या वतीने सुरज चव्हाण याचा सत्कार करण्यात आला. या वेळी विश्वस्त अभिकाका देवकाते, मंदीरातील पुजारी तसेच पुरंदर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते किरण बारभाई व पदाधिकारी उपस्थित होते. युट्युब कलाकार देखील बहुसंख्येने उपस्थित होते.

सुरज ने सर्व रसिक प्रेक्षकानां झापुक झुपुक पिक्चर २५ एप्रिल रोजी प्रदर्शीत होणारा चित्रपट थियटरला जाऊन पहावा असे आवाहन केले.

# शिळफाटा परिसरात अनधिकृत बांधकामांना वेग

## ठाणे मनपाच्या कारवाईला भूमाफियांच्या अतिक्रमणातून आव्हान

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१५, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण ग्रामीण भागातील शिळफाटा परिसरात अनधिकृत बांधकामांनी पुन्हा वेग घेतला आहे. ठाणे मनपाने नुकतीच बुलेट ट्रेनच्या जागेत अतिक्रमण सुरू असलेली इमारत जमिनदोस्त केली होती. मात्र त्यानंतर आता पुन्हा एकदा या परिसरात अनधिकृत बांधकामांनी वेग घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.

या भू-माफियांकडून अतिक्रमणासाठी सकाळची पहाट आणि सायंकाळ व सुट्टीच्या दिवसाचा आधार घेतला जात आहे. या सुरू असलेल्या प्रकारामुळे स्थानिकांकडून पुन्हा एकदा संताप व्यक्त करण्यात येत आहे. ठाणे महापालिकेच्या कल्याण ग्रामीण भागातील आरक्षित जमिनी भूमाफियांनी गिळंकृत केल्या आहेत. शासनाचे विविध असलेले आरक्षण शासनाकडून दुर्लक्षित झाल्याने ते भूमाफियांच्या नजरेत पडले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या कारवाईच्या सापळ्यातून देखील अतिक्रमणधारक सुटका मिळवत असल्याचे दिसून येत आहे. नुकतीच ठाणे मनपाचे अधिकारी मनीष जोशी यांनी शिळफाटा परिसरात बुलेट ट्रेनच्या जागेतील अतिक्रमण जमीनदोस्त करून माफियांना आव्हान दिले होते.

अनधिकृत इमारती जमीन दोस्त करायला सुरुवात ठाणे मनपाने केल्याने भूमाफियांचे चांगलेचधाबे दणाणले होते. मात्र ठाणे मनपाच्या कारवाईचा सापळा ढिला होताच पुन्हा बुलेट ट्रेनच्या गतीने अनधिकृत बांधकाम सुरू झाली आहेत.

दिवा प्रभाग समितीच्या अंतर्गत येणाऱ्या दोस्ती कंपाउंडच्या बाजूला गुलस्थानी हॉटेलजवळ शासनाच्या जागेत बहुमजली इमारतीचे काम सुरू झाले आहे. दरम्यान या वाढत्या अतिक्रमित बांधकामांमुळे ठाण्यामध्ये दिवा शहर आणि परिसर सुसज्ज दिसणार कसा, असा प्रश्न मनसेचे विभाग अध्यक्ष शरद पाटील, शिळगावचे पोलीस पाटील संतोष भोईर, ठाणे काँग्रेस महिला अध्यक्ष वैशाली भोसले यांच्याकडून उपस्थित करण्यात आला आहे.

## २२ मार्च पर्यंत सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिम; मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, बुलडाणा :** जिल्हा क्षयरोग केंद्राच्यावतीने दि. १० ते २२ मार्च २०२५ या कालावधीत शहरातील झोपडपट्टी, विटभट्टी, भटक्याजमाती, स्थलांतरीत कामगार, बेघर कामगार, वृध्दाश्रम, आश्रमशाळा व वस्तीगृह अशा अतिजोखमीच्या भागाचे ३ लाख १ हजार ५३३ लोकसंख्येमध्ये सर्वेक्षण करुण सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहिम राबविण्यात येणार आहे. क्षयरुग्ण शोध मोहिम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी केले आहे.

मोहिमेत आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन घरातील सर्व सदस्यांची क्षयरोगासंदभातील तपासणी करणार आहे. यासाठी जिल्ह्यात १२१ पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच २४ सुपरवाईझर व २४२ आशावर्कर व कर्मचाऱ्यांव्दारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मोहिमेचे उद्दिष्टे क्षयरोगाचे निदानपासून अद्यापही वंचित असणाऱ्या सर्व क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना औषधोपचारावर आणणे आहे.

मोहिमेमध्ये जोखमीच्या क्षेत्र व ठिकाणी गृहभेट देऊन क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींना शोधणे, त्यांची थुंकी नमुने तपासणी, एक्स-रे व आवश्यकते प्रमाणे इतर तपासण्या करुन क्षयरोगाचे निदान करणे



आणि औषधोपचार सुरु करणे अपेक्षित आहे.

यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील कर्मचारी, त्यांचे भागधारक, अशासकीय संस्था तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी यांचे पथके निवडलेल्या भागात घरोघरी संशयित क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे.

यामध्ये जिल्ह्यातील वंचित घटक झोपडपट्टी, दुर्गम भाग, वस्त्या, कारागृहातील कैदी, ज्या गावात रुग्ण जास्त असू शकतात असे गावे, एचआयव्ही अतिजोखीम गट, असंघटित कामगार, बांधकाम स्थळाच्या ठिकाणी काम करणारे कामगार, बेघर वृध्दाश्रम अशा निवडलेल्या भागांमध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी, आशावर्कर, अंगणवाडी सेविका तसेच नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवक हे गृहभेटीव्दारे संशयित क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे. गृहभेटी दरम्यान पथक सदस्य निश्चित केलेल्या सर्व घरांना भेटी देऊन घरात असलेल्या सर्व व्यक्तींची क्षयरोग लक्षणांविषयी माहिती घेणार असून क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींची थुंकी नमुना गोळा करुन तपासणी करिता जवळच्या प्रयोगशाळा पाठविणार आहे.

**क्षयरोगाची लक्षणे :-** दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा खोकला असणे, दोन आठवड्यापेक्षा जास्त मुदतीचा ताप, मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त पडणे, छातीत दुखणे व मानेवारील गाठ. सदर लक्षणे असल्यास व्यक्तीने तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये म ोफत थुंकी नमुना तपासणी, क्ष-किरण तपासणी तसेच डॉक्टरांच्या सल्यानुसार सीबीनॅट मशीनव्दारे तपासणी व्यवस्था उपलब्ध आहे.

क्षयरोग विरोधातल्या लढ्यामध्ये सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता असून अद्याप निदान न झालेल्या क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांचेवर उपचार करण्यात येणार आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते तसेच शहरी भागास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मोहिम राबविण्यात येत आहे.तरी क्षयरुग्ण शोध मोहिमेस सर्वानी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हाय सिक्युरिटी नंबरप्लेट त्वरित बसवून घ्यावी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, ठाणे :** परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील दि.०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक करण्याबाबत सूचित केले आहे. राष्ट्रीय सुरक्षेसाठी, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी, छेडछाड आणि बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्याकामी अशा अनेक प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोटार वाहनांवरील हाय सिक्युरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) बसविणे अत्यावश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने देखील सर्व मोटार वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) चे महत्व लक्षात घेता या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दि.०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. त्याकरिता परिवहन विभागाने या कार्यालयासाठी मे. रियल म ॅझॉन इंडिया लिमिटेड, एजन्सीची नियुक्ती केली असून शुल्क आणि लागणारा वेळ/दिवस निर्धारित केले आहेत.

टू-व्हिलर्स आणि ट्रॅक्टर्स: रु.४५०, थ्री-व्हिलर्स: रु.५००, लाईट मोटर वेहिकल्स/ पॅसेंजर कार/ मिडीयम कमर्शियल वेहिकल/ हेवी कमर्शियल वेहिकल आणि ट्रेलर/ कॉम्बिनेशन: रु.७४५ असे शुल्क आहेत.

या एजन्सीची एचएसआरपी बुकिंग पोर्टल लिंक https://hsrpmhzone2.in आहे. या लिंकवर वाहनांसंबंधी आवश्यक सर्व माहिती अचूक भरावी. परिवहन विभागाच्या सूचनेनुसार लवकरच सर्व जुन्या वाहनांना त्यांची कागदपत्रे तपासून संबंधित एजन्सीकडून एचएसआरपी लावून मिळणार आहे. वाहनमालकांनी परिवहन विभागाने जारी केलेल्या एसओपी नुसार दि.३१ मार्च २०२५ पर्यंत जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट लावणे अनिवार्य केले आहे, असे आवाहन कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे.

## तरुणींमध्ये मूत्राशयाच्या संसर्गाच्या समस्या वाढल्या, कामा रुग्णालयाचा अभ्यास

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** मागील काही वर्षांपासून तरुणींमध्ये लघवी करताना जळजळणे, लघवी तुंबणे किंवा काही कळायच्या आतच लघवी होणे, मूत्राशयामध्ये संसर्ग होणे यांसारख्या मूत्राशयाशी संबंधित समस्या वाढत आहेत. मागील चार वर्षांमध्ये तब्बल ३ हजार १९० महिलांमध्ये या समस्या आढळून आल्या असून, त्यातील ७०४ महिलांवर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे तरुण महिलांचे असल्याचे आढळून आले आहे.




वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाच्या अखत्यारितील स्त्री रोग आणि प्रसूतीसाठी प्रख्यात असलेल्या कामा रुग्णालयात २०१९ मध्ये बाह्यरुग्ण विभागात युरोगायनॅक म्हणजेच ओटीपोटीच्या आजारावरील उपचारासाठी स्वतंत्र केंद्र सुरू करण्यात आले. सरकारी रुग्णालयातील हे पहिलेच केंद्र आहे. या केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात ओटीपोटाचे आजार आढळतात. त्यावर स्त्रीरोग तज्ज्ञ किंवा मूत्ररोगतज्ज्ञ उपचार करीत आहेत. मात्र, या दोन्ही विषयांतील तज्ज्ञ या विभागामध्ये रुग्णांवर उपचार करीत आहेत. कामा रुग्णालयातील यूरोगायनॅक बाह्यरुग्ण विभागांतर्गत २०१९ ते २०२४ या सहा वर्षांत ३ हजार १९० महिलांवर उपचार करण्यात आले. या महिलांना मूत्राशयासंदर्भात होणाऱ्या आजाराचा व संसर्गाचा कामा रुग्णालयातील डॉक्टरांनी अभ्यास केला. या अभ्यासामध्ये दरवर्षी म हिलांमध्ये मूत्राशयाशी संबंधित संसर्ग होण्याचे प्रमाण वाढत असून यामध्ये तरुणींचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले.

**७०४ महिलांवर मूत्राशय सिंचन प्रक्रिया....**

गेल्या सहा वर्षांत रुग्णालयात आलेल्यांचा करण्यात आलेल्या अभ्यासात महिलांमध्ये निम्म्यापेक्षा जास्त प्रमाण तरुणींचे असल्याचे आढळून आले आहे. मूत्राशयामध्ये संसर्गाचे प्रमाण वाढल्याने रुग्णावर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करावी लागते. या प्रक्रियेमध्ये रुग्णाचे मूत्राशय स्वच्छ केले जाते. मागील सहा वर्षांम ध्ये उपचार करण्यात आलेल्या ३ हजार १९० महिलांपैकी ७०४ महिलांवर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करण्यात आल्याचे कामा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी सांगितले.

**असुरक्षित संभोगामुळे प्रमाण वाढतेय...**

तरुण महिलांमध्ये मूत्राशयामध्ये संसर्ग होण्यामागे विविध कारणे आहेत. मात्र त्यामागे असुरक्षित संभोग हे एक महत्त्वाचे कारण आहे. या कारणामुळेच तरुण महिलांमध्ये संसर्ग होण्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. दिवसेंदिवस महिलांमधील या समस्येत वाढ होत आहे. मात्र कामा रुग्णालात ओटीपोटाच्या आजारावरील उपचारासाठी सुरू करण्यात आलेल्या युरोगायनॅक बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या महिलांना दिलासा मिळत असल्याचेही डॉ. तुषार पालवे यांनी सांगितले.

# थोडक्यात

## भाईंदरमध्ये मद्यधुंद तरुणांचा पोलिसावर प्राणघातक हल्ला

### पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, भाईंदर :** धुळवडीच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असताना देखील मद्यधुंद तरुणांनी पोलिसावरच हल्ला केल्याची धक्कादायक घटना भाईंदरमध्ये घडली आहे. भर रस्त्यात सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलिस हवालदारावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, दिनांक १४ मार्च २०२५ रोजी दुपारी भाईंदर पश्चिमेतील शिवसेना गल्ली परिसरात दोन तरुण रस्त्यातच वाद घालत होते. त्या भागात गस्त घालत असलेले पोलीस हवालदार काशिनाथ भानुसे यांनी हा वाद मिटवण्यासाठी हस्तक्षेप केला. मात्र, मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत असताना त्यातील एका तरुणाने भानुसे यांना जोरदार धक्का दिला, तर दुसऱ्याने खिशातून चाकू काढून त्यांच्या पोटावर वार केला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे भानुसे गंभीर जखमी झाले. हल्ला करून दोन्ही तरुण घटनास्थळावरून पळून गेले. मात्र, तिथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी तातडीने जखमी पोलिसाला खासगी रुग्णालयात दाखल केले. जिथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच भाईंदर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि साक्षीदारांच्या मदतीने काही तासांतच आरोपींचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी कमलेश गुप्ता आणि दिलीप खडक या दोन आरोपींना अटक केली.

भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कांबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही आरोपी हल्ल्याच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत होते. त्यांनी कोणत्याही कारणाशिवाय पोलिसावर हल्ला केला. या घटनेमुळे पोलीस दलात संतापाची भावना असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. पोलिसांनी दोघांविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. शहरात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांवरच हल्ला होण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. अशा प्रकारच्या घटनांवर कडक कारवाई न झाल्यास भविष्यात गुन्हेगारीला अधिक चालना मिळू शकते. त्यामुळे समाजातील प्रत्येकाने अशा गुन्हेगारी प्रवृत्तीचा विरोध करावा आणि पोलिसांना सहकार्य करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जगप्रसिद्ध रांजणखळगे विकासासाठी निधी द्या - आमदार दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत केली आहे. अर्थसंकल्प चर्चेसाठी त्यांना सभापती राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत बोलण्याची संधी दिली. यावेळी ते म्हणाले, जगप्रसिद्ध रांजणखळगे हा राज्याचा अनमोल ठेवा आहे. हे पर्यटन क्षेत्र जगात नावलौकिकास पात्र ठरले आहे. या ठिकाणी विकासकामे मोठ्या प्रमाणात झाल्यास पर्यटन माध्यमातून युवकांना व्यवसायाच्या दृष्टीने रोजगार निर्मिती होईल. यासाठी ग्रामस्थांनी २५० कोटींचा विकास आराखडा तयार केला आहे. हा आराखडा राज्य सरकारने मंजूर करावा. अशी मागणी आमदार दाते यांनी केली आहे. तसेच तालुक्यातील सिद्धेश्वर व दर्याबाई हा परिसर निसर्गरम्य आहे. पर्यटन माध्यमातून या ठिकाणी विकासकामे झाल्यास याचा फायदा तालुक्यातील जनतेला तसेच राज्याला मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. यासाठी पर्यटन निधी मोठ्या प्रम ाणात मिळण्याची गरज आहे. तसेच गोदावरी खोरे विकास प्रकल्पाचा फायदा पारनेर तालुक्यातील गावांना मिळण्यासाठी यासाठी सुद्धा मोठ्या निधीची आवश्यकता आहे. राज्याचा अर्थसंकल्प जनतेसाठी लाभदायक राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक चांगला अर्थसंकल्प मांडला असून तो राज्यातील जनतेसाठी लाभदायक आहे. अर्थसंकल्पात लाडक्या बहिणीसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. जनता व विकास यांचा समन्वय ठेवून या वर्षीचा अर्थसंकल्प जनविकासासाठी सर्वोत्तम आहे. राज्याचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्री मंडळातील सदस्यांनी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत.

## विंचूरला जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीजसोहळा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनाला ३७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने रविवार, दिनांक १६ मार्च २०२५ पासून विंचूरकर ग्रामस्थांच्या वतीने येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात तुकाराम बीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पालखीतून तसेच प्रतिमेची सजवलेल्या रथातून दुपारी



४:३० वाजता पालखी सोहळा टाळ-मृदंगाच्या गजरात येवला येथील १५० मुले ह.भ.प. जमदाडे ताई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच धानोरे येथील ५० मुले ह.भ.प. सागर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य मिरवणूक काढली जाणार आहे.

सायंकाळी ७ ला गावातील गुणवंतांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ७:३० ते रात्री ९ या वेळेत आळंदी येथील ह.भ.प. सुनील महाराज शिंदे यांचे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या जीवन चरित्रावर आधारित कीर्तन होणार आहे. हा तुकाराम बीज सोहळा हरिभक्त परायण ज्ञानेश्वर महाराज आळंदी (छोटे माऊली) यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. महाप्रसाद वाटपाने या सोहळ्याचा समारोप होणार आहे.